## फ्लिपकार्टच्या ‘बिग बिलियन डेज’च्या १० व्या पर्वापुढे, भारतभरातील दमदार पुरवठा साखळीच्या मजबुतीकरणाचे आणि परिसंस्थेच्या कायापालटाचे, ध्येय

- *फ्लिपकार्ट फुलफिलमेंट केंद्रे, वर्गीकरण (सॉर्टेशन) केंद्रे व डिलिव्हरी केंद्रे ह्या देशभरातील आपल्या पुरवठा साखळीत १,००,०००हून अधिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करणार*
- *सणासुदीच्या काळात आपल्या किराना डिलिव्हरी कार्यक्रमामार्फत ४० टक्क्यांहून अधिक शिपमेंट्स पोहोचवण्याची योजना*
- *सणासुदीच्या काळाच्या दृष्टीने हजारो कामगारांसाठी कौशल्यविकास व प्रशिक्षणाच्या संधी निर्माण करण्यात आल्या आहेत, त्यामुळे देशाच्या अत्यंत दुर्गम भागात लक्षावधी पॅकेजेस पोहोचवणे शक्य होणार*

**बेंगळुरू- ४ सप्टेंबर, २०२३:** फ्लिपकार्ट ही भारतातील एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठ आपल्या ‘द बिग बिलियन डेज (टीबीबीडी)’ ह्या फ्लॅगशिप वार्षिक उपक्रमाच्या १०व्या आवृत्तीसाठी सज्ज होत आहे. सणासुदीचा काळ जवळ आला असल्याने, आपल्या भारतभरातील पुरवठा साखळीमध्ये लाखो हंगामी रोजगार निर्माण करून तसेच कर्मचारी नियुक्त करून, सणासुदीच्या काळातील ग्राहकांची वाढती मागणी पूर्ण करण्याची, फ्लिपकार्टची, योजना आहे.

फ्लिपकार्टच्या पुरवठा साखळीच्या उत्कृष्ट कामगिरीचा पाया त्यांचे वैविध्यपूर्ण व विस्तृत मनुष्यबळ हाच आहे. सणासुदीच्या काळात फ्लिपकार्ट फुलफिलमेंट केंद्रे, वर्गीकरण (सॉर्टेशन) केंद्रे व डिलिव्हरी केंद्रे ह्यांचा समावेश असलेल्या पुरवठा साखळीमध्ये १,००,०००हून अधिक रोजगारांच्या नवीन संधी निर्माण करणार आहे. ह्या हंगामी रोजगारांमध्ये स्थानिक किराणा डिलिव्हरी भागीदार, स्त्रिया, विकलांग व्यक्ती (पीडब्ल्यूडी) व अन्य व्यक्तींचा समावेश केला जाणार आहे आणि त्यायोगे पुरवठा साखळीतील वैविध्यपूर्ण प्रतिभेसाठी मार्ग निर्माण केले जाणार आहेत. यंदा फ्लिपकार्टने आपली पुरवठा साखळी अखेरच्या टप्प्यापर्यंतच्या वितरण केंद्रांपर्यंत व मोठ्या प्रमाणावरील फुलफिलमेंट केंद्रांपर्यंत विस्तारली आहे. त्यामुळे श्रेणी-३ शहरे व त्यापलीकडील भागातील

फ्लिपकार्टची पोहोच अधिक भक्कम झाली आहे. कंपनीने उत्तरप्रदेश, गुजरात, बिहार, पंजाब, राजस्थान, तेलंगण आणि अशा अनेक राज्यांमध्ये मिळून ११ लाख चौरस फुटांहून अधिक जागेची भर घातली आहे.

अखेरच्या ग्राहकाला प्रसन्न अनुभव देण्याच्या उद्देशाने, फ्लिपकार्ट, पुरवठा साखळीत रुजू झालेल्या मनुष्यबळासाठी, प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातून खास विकसित केलेले कौशल्यविकास उपक्रम, हाती घेते. त्यामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती व अर्थव्यवस्थेलाही लक्षणीयरित्या उत्तेजन मिळते. पुरवठा साखळी प्रक्रियेत नियुक्त करण्यात आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना संबंधित कामांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यांना हातात घेऊन वापरण्याची (हॅण्ड-हेल्ड) उपकरणे, पीओएस यंत्रे, स्कॅनर्स, विविध मोबाइल ॲप्लिकेशन्स व बरेच काही हाताळण्याचे प्रशिक्षण दिले जाते. परिणामी, हे कर्मचारी तंत्रज्ञानाधारित पुरवठा साखळ्या, फूड टेक तसेच अन्य संबंधित उद्योगांसाठी काम करण्यासाठी भविष्यकाळाच्या दृष्टीने सज्ज होऊ शकतात.

**फ्लिपकार्ट समूहातील पुरवठा साखळी, ग्राहक अनुभव व रिकॉमर्स विभागांचे प्रमुख व वरिष्ठ उपाध्यक्ष हेमंत बद्री** म्हणाले, *"टीबीबीडी हा उपक्रम व्याप्ती वाढवणे, भारतात नवोन्मेष साध्य करणे व परिसंस्थेवर प्रभाव टाकण्याच्या उद्देशाने राबवला जातो. ह्या उपक्रमामुळे लक्षावधी नवीन ग्राहकांना ई-कॉमर्समधील चांगल्या बाबींचा अनुभव घेता येतो. त्यातील अनेक जण प्रथमच हा अनुभव घेतात. टीबीबीडीदरम्याच्या जटीलतेमुळे तसेच व्यापकतेमुळे आम्हाला क्षमता, साठवण, प्लेसमेंट, वर्गीकरण, पॅकेजिंग, मनुष्यबळाचा विकास, प्रशिक्षण, डिलिव्हरी आणि संपूर्ण पुरवठा साखळीचा आवाका वाढवण्याची गरज भासते. ह्याचे प्रमाण नेहमीच अभूतपूर्व असते. यंदा आम्ही आमच्या पुरवठा साखळीत सुमारे एक लाख नवीन रोजगार निर्माण करणार आहोत. त्याचप्रमाणे देशभरात आम्ही आमचे स्थान भक्कम करत असल्यामुळे ग्राहकांचा अनुभव अधिक उंचीवर नेण्यासाठी कौशल्यविकास उपक्रमांमध्येही आम्ही गुंतवणूक करत आहोत. यंदा ४० टक्क्यांहून अधिक शिपमेंट्स किराना डिलिव्हरी कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्याची आमची योजना आहे. आम्ही दरवर्षी सातत्याने आमच्या पुरवठा साखळी क्षमता विस्तारत आहोत. त्यातून आमच्या सहयोगींची समृद्धी वाढवण्याचे उद्दिष्ट तर आमच्यापुढे आहेच, शिवाय, आमच्या वैविध्यपूर्ण*

***उत्पादनांची डिलिव्हरी कक्षा भारताच्या दुर्गमातील दुर्गम भागापर्यंत विस्तारण्यातील त्यांचे योगदानही ह्यामुळे वाढणार आहे."***

**सणासुदीचा काळ आणि बिग बिलियन डेज हे घटक संपूर्ण परिसंस्थेची टप्प्याटप्प्याने वाढ साध्य करण्यासाठी महत्त्वाचे चालक ठरतात. ह्या परिसंस्थेमध्ये किराणा डिलिव्हरी पार्टनर्स, विक्रेते, एमएसएमई, कारागीर/विणकर, गोदामातील कर्मचारी आणि अनेकांचा समावेश होतो. हे सर्व घटक ह्या चळवळीच्या अग्रभागी आहेत. देशभरातील वाढीव शिपमेंट डिलिव्हरींचा लाभ घेण्याची क्षमता त्यांना मिळते, त्यांचे उत्पन्न लक्षणीयरित्या वाढते आणि पुरवठा साखळीच्या चौकटीतच त्यांची भरभराट होते. पुरवठा साखळीच्या शक्तीचा लाभ घेऊन, आपल्या वार्षिक फ्लॅगशिप उपक्रमाचे १०वे पर्व साजरे करण्यास फ्लिपकार्ट सज्ज आहे. फ्लिपकार्टच्या प्रभावी उपस्थितीचे प्रतिबिंब संपूर्ण ई-कॉमर्स क्षेत्रात दिसून येणार आहे तसेच असंख्य व्यक्तींच्या आयुष्यांत तिचा प्रतिध्वनी दुमदुमणार आहे.**

<u>**About the Flipkart Group**</u>

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, Flipkart Wholesale, Flipkart Health+, and Cleartrip.

Started in 2007, Flipkart has enabled millions of sellers, merchants, and small businesses to participate in India's digital commerce revolution. With a registered customer base of more than 450 million, Flipkart's marketplace offers over 150 million products across 80+ categories. Today, there are over 11 lakh sellers on the platform, including Shopsy sellers. With a focus on empowering and delighting every Indian by delivering value through technology and innovation, Flipkart has created lakhs of jobs in the ecosystem while empowering generations of entrepreneurs and MSMEs. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns, which are customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians.

For more information, please write to media@flipkart.com